PDF Compressor Free Version

महेंद्र पेडावाला
रजवाडी
गुजराती थाळी
दर रविवार - दालवाटी, चुरमा
* थाळीमध्ये दररोज आमरस *
(रेल्वे पार्सल सुविधा)
किटी पार्टी, बर्थ डे पार्टी
करिता ५० जणांची उत्तम व्यवस्था
(आमरस - ४००/- रु. किलो मिळेल)
कापड बाजार,
कोहिनूर शेजारी, अ. नगर

RNI No. 6153/57

# समाचार
# SAMACHAR

महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर
(रविवार, दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते संध्या. ६)
गरोदर माता व सर्व वयोगटातील महिला व मुलींची
मोफत आरोग्य तपासणी, सल्ला व मार्गदर्शन
शिबिरात सहभागींना सोनोग्राफीवर 50% सूट
नॉर्मल डिलिव्हरी रु.9,500/-, सिझेरियन रु.20,500/-
शिबिराचे ठिकाण :- जगताप हॉस्पिटल व प्रसुतिगृह
पुणे बसस्टँडजवळ, स्वस्तिक चौक, हॉटेल रेडियन्सच्या पाठीमागे, अहमदनगर.
मो. 74105 94116, फोन (0241) 7961062.

Volume - 72 | Issue- 209 | Marathi Daily | Friday 26/4/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3



संपादकीय

# कर चुकवेगिरी टाळण्यासाठी...

कर टाळण्याच्या धोरणांना कायदेशीर मानले जाते आणि करनियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी कर व्यावसायिकांच्या सहाय्याने अनेकदा अंमलबजावणी केली जाते. कर टाळण्यामुळे कराचा कमी भरणा होऊ शकतो; परंतु त्यात फसवणूक, चुकीचे वर्णन किंवा बेकायदेशीर क्रियाकलाप समाविष्ट नसतात. दुसरीकडे, सरकारला देय असलेला कर भरावा लागू नये म्हणून जाणीवपूर्वक चुकीची माहिती देणे किंवा आर्थिक माहिती लपवणे ही बेकायदेशीर बाब पहायला मिळते. यामध्ये उत्पन्नाचा अहवाल जाणूनबुजून कमी करणे, करकपात वाढवणे, आर्थिक मालमत्ता लपवणे किंवा कर भरणे टाळण्यासाठी इतर फसव्या क्रियाकलापांमध्ये गुंतणे यांचा समावेश होतो. करचुकवेगिरी हा कायद्याने दंडनीय फौजदारी गुन्हा आहे आणि त्यामुळे दंड, तुरुंगवास आणि नागरी उत्तरदायित्व यासह गंभीर दंड होऊ शकतो. कंपन्या आणि व्यक्ती जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी आणि आर्थिक स्थिरता प्राप्त करण्यासाठी कर आश्रयस्थानांचा वापर करतात. अनेक देशांना गुंतवणुकीसाठी अनुकूल कर दर आणि धोरणांचा परिणाम म्हणून आधुनिक कॉर्पोरेट कर आश्रयस्थान मानले जाऊ शकते; परंतु व्यवसाय चालवण्याची किंमत, संसाधनांशी जवळीक, परकीय गुंतवणुकीची सुलभता आणि आयात आणि निर्यात शुल्क दर यासारखे घटक कमाईवर परिणाम करू शकतात. सर्वोत्तम कर आश्रयस्थाने गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त नफा मिळवण्यास सक्षम करतात. मात्र अनेक देशांमध्ये गैरमार्गाने गुंतवणूक करुन, तिथल्या सैल नियमांचा आधार घेऊन अनेक व्यक्ती आणि कंपन्या उलटसुलट व्यवहार करतात.२०२२-२३ मध्ये मॉरिशस हा भारतासाठी थेट विदेशी गुंतवणुकीचा, म्हणजेच एफडीआयचा तिसरा सर्वात मोठा स्रोत होता. सेबीने दहा वर्षांपूर्वी दिलेल्या आकडेवारीनुसार, त्यावेळी मॉरिशसमध्ये नोंदणी असलेल्या विदेशी गुंतवणूकदार संस्था किंवा एफआयआयकडून भारतात ३ लाख ७१ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली होती. मात्र मॉरिशसमधून काळ्या पैशांचे व्यवहार प्रचंड प्रमाणात होतात, असा आरोप झाल्यावर त्या देशाची पत कमी झाली. तत्कालीन मनमोहन सिंग सरकारने मॉरिशसकडून ९७ प्रकरणांबद्दलची गुंतवणुकींची माहिती मागवली होती. नरेंद्र मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर तेव्हाच्या परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी मॉरिशसचा दौरा केला. दुहेरी करनिर्धारण कराराबाबत मॉरिशसला असलेल्या शंकांचे निरसन करतानाच सुषमा स्वराज यांनी तेथील कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याचे निमंत्रण दिले होते. त्यांनी मेक इन इंडिया या उपक्रमात अधिकाधिक गुंतवणूक करण्याचे आवाहनही केले होते.उभय देशांमधील डीटीएएच्या तरतुदीमुळे फॉरेन पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्स (एफपीआय) आणि फॉरेन एंटिटीज आपल्या भारतातील गुंतवणूका मॉरिशसमार्गे करत होत्या. अमेरिका, सिंगापूर आणि लक्झेम्बर्गनंतर भारतात अशा प्रकारची सर्वाधिक गुंतवणूक मॉरिशसमधूनच केली जाते. मार्च २०१४ अखेर संपलेल्या वर्षात भारतात ६९ लाख कोटी रुपये एफपीआय गुंतवणूक झाली. त्यापैकी चार लाख १९ हजार कोटी रुपये मॉरिशसमधून आले. परस्परव्यापार आणि गुंतवणूक हा पूर्वीच्या कराराचा मुख्य उद्देश होता. आता सुधारित करारात दुहेरी करआकारणी थांबवणे आणि त्याच वेळी लबाड्या करून करदायित्व टाळण्याच्या फटी बुजवणे, असा उद्देश आहे. परवाना राज पूर्ण संपवणे, निवडणूक पद्धतीत पारदर्शकता आणणे, अर्थव्यवस्थेचे डिजिटलीकरण तसेच विविध कल्याणकारी योजनांचा पैसा थेट नागरिकांच्या खात्यात जमा करणे, या उपायांमुळे भारतातील काळा पैसा काही प्रमाणात कमी झाला आहे. १९८३-८४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार, त्यावेळी भारतात ३२ ते ३७ हजार कोटी रुपयांचा काळा पैसा होता. सीबीआयच्या माजी संचालकांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात एकूण ४०० ते ५०० लाख कोटी रुपये इतका काळा पैसा आहे. हा आकडाही काही वर्षांपूर्वीचा आहे. ग्लोबल फायनान्स इंटिग्रिटीने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये स्वतंत्र भारतातील सरकारच्या स्थापनेपासून काळ्या पैशाची माहिती जमा करण्यात आली होती. त्या अहवालानुसार, १९४८ ते २००६ या वर्षांमध्ये सुमारे ४६२ अब्ज इतकी डॉलर रक्कम देशाबाहेर पाठवण्यात आली.भारतात येणारे निम्मे विदेशी भांडवल हे मॉरिशस मार्गे येते. भारतातून मॉरिशसला निधी पाठवायचा, तेथे कंपनी स्थापन करायची आणि मग तो पैसा परत भारतात आणायचा, याला मॉरिशस रूट असे म्हणतात. हे काळे व्यवहार थांबवणे, हे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे. ताज्या करार-मदारांमधून हे कितपत साध्य होते, ते आता बघायचे.



# भोरवाडी येथील शिबिरात १२४ रक्तपिशव्या संकलित

**समाचार/नगर-दि.२६**

रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीतून समाजापुढे एक वेगळा आदर्श उभा राहतो, असे प्रतिपादन भोरवाडी येथील दर्शन आश्रमचे अध्यक्ष नितीन भोर यांनी केले.

भोरवाडी येथे दर्शन आश्रम आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी भोरवाडीचे सरपंच भास्कर भोर, मालेगाव ब्लड सेंटरचे संचालक कैलास सोनवणे, बाबासाहेब भोर, रंगनाथ जासूद, संतोष गायके आदी मान्यवर उपस्थित होते.

दरवर्षी या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. शिबिराचे हे दुसरे वर्ष आहे. सकाळी आठ वाजता दीपप्रज्वलनाने रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आली. मालेगाव ब्लड बँकेच्या डॉक्टरांच्या टीमने दिवसभरामध्ये १२४ रक्त पिशव्यांचे संकलन केले. या शिबिराला भोरवाडी ग्रामस्थांसह पंचक्रोशीतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या रक्तदान शिबिरात १२४ रक्त पिशवी संकलित झाल्या. मालेगाव ब्लड सेंटरचे आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप भावसार, निवृत्ती सोनवणे, आकाश कुमावत, मनोज वडनेरे अजय पवार यांच्यावतीने शिबिरात रक्त संकलनाचे काम करण्यात आले. यावेळी प्रतीक भोर,प्रवीण जासूद,चंद्रकला भोर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्तविक राजेंद्र भोर यांनी केले. आभार विशाल जासूद व अरुण भोर यांनी केले.

# एपीएल २०२४ क्रिकेट स्पर्धेचे नगरला आयोजन

**समाचार/नगर-दि.२६**

मुलांना बालवयातच क्रिकेट खेळाचे योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने व एस के क्रिकेट कॅडमीच्या वतीने १४ वर्षे आतील खेळाडूंसाठी एपीएल २०२४ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे




खेळाडूंना बालवयातच क्रिकेटचे धडे मिळावेत यासाठी एस के क्रिकेट अकॅडमीच्या वतीने जिल्हास्तरीय एपीएल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले असून १४ वर्षे आतील खेळाडूंनी नाव नोंदणी करण्यासाठी कराळे हेल्थ क्लब येथे फॉर्म उपलब्ध आहे. निवड चाचणीसाठी आपली नाव नोंदणी करावी, असे आवाहन एस के अकॅडमीचे संचालक क्रिकेटर संदीप आडोळे यांनी केले.

# प्राण-नाथ

जॉनी मेरा नाम, चा एक सीन २००७ सालच्या,' जॉनी गद्दार', चित्रपटात दाखवला आहे ज्यात एका कॅरेक्टरला जॉनी हे खोटं नावं दिलं आहे आणि म्हणून चित्रपटाच नावं,' जॉनी गद्दार'.

जॉनी मेरा नाम, १९७० सालचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट. 'जॉनी मेरा नाम', हेमा मालिनी आणि देव साहेबांचा पहिला नायक आणि नायिका म्हणून चित्रपट. त्यांनी त्यानंतर आठ चित्रपट केले. ', तेरे मेरे सपने', ( हा गोल्डी आंनद यांचा 'जॉनी मेरा नाम' नंतरचा अगदी वेगळ्या धाटणीचा चित्रपट. याच चित्रपटातून गोल्डी आनंद यांनी निर्माता म्हणून पदार्पण केलं), ' शरीफ बदमाश,' ' जोशीला', ' छुपा रुस्तम', ' अमीर गरीब', ' सच्चे का बोलबाला', ' सेन्सर', आणि ', अमन के फरिश्ते', हे ते नऊ चित्रपट. पण,' जॉनी मेरा नाम' चित्रपटाची सर कोणालाच नाही. 'तेरे मेरे सपने', नक्कीच वेगळा चित्रपट, पण जॉनी मेरा नाम', म्हणजे या सम हाच. त्यामुळेचं की काय, देव साहेब आणि गोल्डी आनंद हे हेमा मालिनी यांचे फेव्हरेट नायक आणि दिग्दर्शक. चित्रपटाने २020 साली पन्नाशी पूर्ण केली तेंव्हा हेमामालिनी यांनी चित्रपटाचा गौरवपूर्ण उल्लेख तर केलाच पण त्या, जॉनी मेरा नाम च्या टायटल ट्रॅकबद्दल सुद्धा खूप भरभरून बोलल्या. पन्नास वर्षानंतर सुद्धा चित्रपटाचा टायटल ट्रॅक लोकांच्या लक्षात आहे असंही त्यांनी अभिमानानं नमूद केलं. खरंतर हेमा मालिनी यांच्या आधी, गोल्डी आनंद यांनी नायिकेच्या भूमिकेसाठी शर्मिला टागोर यांना विचारलं होतं पण शर्मिला टागोर यांना ती भूमिका अतिशय थिल्लर वाटली आणि त्यांनी नकार दिला.

## सुहाना सफर...



चित्रपटातील आणखीन एक मुख्य भूमिका प्राण साहेबांची. प्राण साहेब एव्हाना एक लोकप्रिय चरित्र अभिनेता म्हणून हिंदी चित्रपटसृष्टीत स्थिरावले होते. बलराज सहानी यांच्याप्रमाणे, आता प्राणसाहेबांवर अनेक चित्रपट, चरित्र अभिनेता म्हणून तारून नेण्याची जबाबदारी येऊन पडली होती. अर्थात,' जॉनी मेरा नाम' मध्ये प्राण साहेब, दुधात साखर मिसळावी आणि दुधाची गोडी अजूनच बहारदार व्हावी अशा भूमिकेत दिसले आणि शोभले. प्राण साहेब आणि देव साहेब, ' जॉनी मेरा नाम', नंतर पुन्हा 'देस-परदेस', चित्रपटात भाऊ - भाऊ म्हणून दिसले.

इथेही प्राण साहेब यांच्या भूमिकेत आधी, गोल्डी आनंद यांना प्रेमनाथ हवे होते पण शेवटी त्यांनी प्राण साहेबांनाच पसंती दिली आणि एका खानदानी, रुबाबदार खलनायकाची भूमिका प्रेमनाथ यांना दिली. ( प्रेमनाथ, माझं एक आवडतं स्क्रीन व्यक्तिमत्व, मी खूपच फॅन आहे त्यांचा) प्रेमनाथ यांच्या इतका जबरदस्त पर्सनॅलिटी असलेला उमदा खानदानी खलनायक फारच विरळा, त्यांची स्वतःची एक स्टाईल होती. ते ऑनस्क्रीन आणि ऑफस्क्रीन सहज एखाद्याला भूल पाडत.

बारीक-सारीक: जॉनी मेरा नाम च्या गाण्याच्या पार्श्वभूमीबद्दल थोडंसं. 'बाबूल प्यारे..' या सिरीयस गाण्याचं कंपोझिशन गोल्डी आनंद, यांनी आंनदजी यांच्याकडून करून घेतलं आणि,' पल भर के लिए ',या बहारदार गाण्याचं कंपोझिशन गोल्डी आनंद, यांनी कल्याणजी भाई यांच्याकडून करून घेतलं.

**- देवाशिष शेडगे**

**मो.८८०६०४४४८६**




## राशीभविष्य

- **मेष** : आप्तांच्या गाठीभेटी होतील. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. उपजत कला-गुणांना वाव मिळेल.
- **वृषभ** : खर्चाचं प्रमाण वाढेल. कौटुंबिक समस्या हैराण करतील. स्थावर प्रश्न आणखी बिकट बनतील.
- **मिथुन** : अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. दिलासादायक घटना घडतील. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **कर्क** : शुभ घटनांनी समाधान लाभेल. यांत्रिक क्षेत्रात विशेष प्रगती होईल. प्रवास शक्यतो टाळावा.
- **सिंह** : चिंता वाढवणाऱ्या घटना संभवतात. व्यवसायात साधारण स्थिती राहील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **कन्या** : व्यवसायात प्रतिकूलता राहील. आवडीच्या छंदांना वाव मिळेल. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल.
- **तूळ** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. विवाहातील अडचणी दूर होतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **वृश्चिक** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. जुनी दुखणी उद्भवू शकतात. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **धनु** : महत्त्वाच्या कामांबाबत दिलासा मिळेल. नव्या ओळखी कामी येतील. प्रवासात काळजी घ्यावी.
- **मकर** : नव्या योजना मार्गी लागतील. महत्त्वाच्या भेटीतून लाभ होईल. बेरोजगारांना दिलासा मिळेल.
- **कुंभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. घरगुती व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. आनंदी रहाल.
- **मीन** : सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील. घरगुती वाद वेळीच टाळायला हवे. बाकी चिंता नसावी.

## दिनविशेष

### २७ एप्रिल

**२०१३ :** पाकिस्तानच्या तुरुंगातील सरबजितसिंगची प्रकृती चिंताजनक.
**२०१५ :** नेपाळमधील भूकंपामुळे भारतीय उपखंड तीन मीटर सरकल्याचे संशोधकांचे प्रतिपादन.
**२०१७ :** अभिनेता विनोद खन्ना यांचे निधन.
**२०१८ :** सर्वाधिक शस्त्रे तैनात असलेली सीमा ओलांडत उत्तर कोरियाचे अध्यक्ष किम जोंग उन यांनी दक्षिण कोरियामध्ये पाऊल टाकलं. कोरियन द्वीपकल्पात शांततेचे वारे वाहण्याचे संकेत.

आरोग्यमंत्र

## फायदे रबिंग अल्कोहोलचे

अतिउत्साहाच्या भरात न पेलण्याजोगे शारीरिक श्रम घेतल्यास वेदना सहन कराव्या लागतात. अशा वेळी रबिंग अल्कोहोल हा वेदनांवरचा उपाय ठरु शकतो. दुखऱ्या जागेवर रबिंग अल्कोहोलने मसाज केला तर औषधांची गरज भासत नाही. अल्कोहोलने मसाज करावा आणि एक तासाने आंघोळ करावी. वेदना नाहीशा होतील.



✻ रबिंग अल्कोहोलमध्ये व्हाईट व्हिनेगरचे काही थेंब मिसळावे आणि हे मिश्रण कानात घालावं. यामुळे पोहताना कानात पाणी शिरत नाही.

✻ बऱ्याचदा नखांवर बुरशी येते. अशा वेळी कापसावर रबिंग अल्कोहोलचे काही थेंब घेऊन नखांवर चोळावे. ३० मिनिटांनंतर हात धुवावे. बुरशीची समस्या नष्ट होईल.

✻ साधी जखम असेल तर रबिंग अल्कोहोलने स्वच्छ करावी. सुरुवातीला थोडी आग होईल पण जंतूसंसर्गाचा धोका कमी होईल.

✻ डासांच्या डंखांनी फोड आले असतील तर जळजळणाऱ्या जागी रबिंग अल्कोहोलने मसाज करावा. यामुळे आग थांबेल.

✻ सर्दी झाल्यास नाक चोंदण्याचा, नाकाचा शेंड्याची त्वचा संवेदनशील होण्याचा त्रास होतो. अशा वेळी नाकाजवळ अथवा ओठांवर रबिंग अल्कोहोल लावून ठेवावं. दहा मिनिटानंतर चेहरा धुवावा. या उपायाने सर्दी कमी होईल तसंच त्वचादेखील सामान्य होण्यास मदत होईल.

भावार्थ

## पृथ्वीच्या उत्पत्तीबाबत...

शास्त्रज्ञांना पृथ्वीच्या उत्पत्तीचं गूढ उकलण्यात अजूनही यश आलेलं नाही. मात्र तिच्या उत्पत्तीबाबतचे उल्लेख अथर्ववेदात आढळतात. अथर्ववेदातल्या भूमीसुक्तात पृथ्वीचं वर्णन करण्यात आलं आहे. ब्रह्मा आणि विश्वकर्मा या देवतांमुळे पृथ्वीची उत्पत्ती झाल्याने उल्लेख यात आहेत. यात पृथ्वीला माता आणि मनुष्याला तिच्या अपत्याची उपमा दिली आहे. या सुक्तातल्या ६३ मंत्रांमध्ये पृथ्वीची थोरवी वर्णन केली आहे तसंच पृथ्वीप्रती मनुष्याच्या दायित्त्वांचं वर्णनही यात आढळतं. पृथ्वीच्या उत्पत्तीबाबतच्या श्लोकांनुसार विश्वकर्माने अंतराळात होमहवन केलं. त्यामुळे पृथ्वी आणि तिच्यात दडलेले भोज्य पदार्थ प्रगट झाले. यामुळे पृथ्वीवरच्या माणसांचं भरणपोषण होण्यास मदत झाली. विश्वकर्माने लोककल्याणाच्या भावनेने हा होम केला. त्यावेळी ब्रह्मा, विष्णू आदी देवता प्रगट झाल्या. प्रत्येक देवतेच्या शरीरातून निघालेल्या शक्तिलहरींचा एक शक्ती पुंजका तयार झाला आणि मग या पुंजक्याचं पृथ्वीत रूपांतर झालं, असा उल्लेख अथर्ववेदात आहे.

ग्रुमिंग

## स्टाईलमध्ये मिरवा

सध्या युवकांमध्येही ट्रेंडी दागिने वापरण्याचा कल दिसतो. अर्थात सध्याच्या युवावर्गाला मोजके पण देखणे दागिने घालून मिरवायला खूप आवडते. तुम्हीही त्यातीलच एक असाल तर हा फॅशन ट्रेंड अवश्य फॉलो करा. तुम्ही बॉय बँडचे चाहते असाल तर कानात दागिना घालायला हरकत नाही. मुलांनी कान टोचून घेणं आणि त्यात कानातलं घालणं काही नवं नाही. गेल्या काही वर्षांपासून ही फॅशन अस्तित्वात आहे. तुम्ही हूप प्रकारची कानातली म्हणजेच बाली घालून बिनधास्त मिरवू शकता. खड्याचं कानातलंही छान दिसेल. तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणे कानातल्याची निवड करू शकता. चांदीचं कडं किंवा ब्रेसलेट हा सुद्धा एक भन्नाट पर्याय ठरू शकतो. हे ब्रेसलेट फॉर्मल तसंच कॅज्युअल अशा कोणत्याही ऑकेजनला चालून जाईल. रॉक अँड रोल अंगठी हा प्रकारही सध्या चांगलाच इन आहे. ही अंगठी फॉर्मल्ससह शर्ट आणि शॉर्टवरही शोभून दिसते. तेव्हा ती घाला आणि स्टाईलमध्ये मिरवा.

पंचांग

**शनिवार, २७ एप्रिल २०२४**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र कृ. ३, नक्षत्र : ज्येष्ठा,
चंद्रराशी : वृश्चिक, परिघ योग
सूर्योदय ६.१५, सूर्यास्त : १८.५८

फॉरवर्डस

**जोडीदार सदोदित आनंदी रहावा अशी इच्छा असणारं मन म्हणतं...**

हर वक्त मुस्कुराना फिदरत हैं हमारी,
आप यूं ही खुश रहें हसरत हैं हमारी।

स्मार्ट टॉक

मंडळी, गुगलकडे तुमच्या सर्फिंगचा ट्रॅक रेकॉर्ड असतो. पण तुमची सर्च हिस्ट्री ट्रॅक होऊ नये, असं वाटत असेल तर 'डू नॉट ट्रॅक' हा ऑप्शन एनेबल करता येईल. ब्राउजरच्या सेटिंगमध्ये जाऊन प्रायव्हसी टॅब हा ऑप्शन निवडा. इथे 'डू नॉट ट्रॅक' हा ऑप्शन तुम्हाला दिसेल. ऑफलाईन पेज सेव्ह करण्याची सुविधा गुगलमध्ये आहे. यात पेज सेव्ह केल्यानंतर इंटरनेट नसतानाही ते वाजता येतं. यासाठी ऑनलाईन असताना पेज पीडिएफमध्ये कव्हर्ट करून सेव्ह करावं लागेल. यासाठी सर्वात आधी मेन्यूमध्ये जा. प्रिंट ऑप्शनवर क्लिक करा. पीडिएफचा ऑप्शन निवडून पेज सेव्ह करा.

करिअरवाटा

## प्रशिक्षक व्हायचेय?

पर्यटनाकडे पाहण्याची लोकांची दृष्टी बदलण्याच्या या युगात करिअरचा उत्तम पर्याय म्हणून या क्षेत्राकडे पाहता येईल. पर्यटनामध्ये धाडसी खेळांनाही लोकप्रियता मिळत आहे. वॉटर पार्क, स्केईंग, पॅराग्लायडिंग किंवा स्कुबा डायव्हिंग असे किती तरी प्रकार पर्यटकांच्या पसंतीस उतरत आहेत. या शिवाय जंगलातली भटकंती, कार रॅली, बायकिंग इतकंच नव्हे तर स्पिरिच्युयल टुरिझम आदींनादेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. हे सगळे प्रकार पाहिल्यानंतर आणि त्यांची होणारी वाढ पाहिल्यानंतर हे करिअरचं किती मोठं क्षेत्र आहे याची कल्पना येते. या क्षेत्रात प्रशिक्षक किंवा डेमॉस्ट्रेटर्स म्हणून काम करणाऱ्यांची मागणी वाढत आहे. या पदांसाठी उत्तम वेतन प्राप्त करता येतं. स्कुबा डायव्हिंगमध्ये प्रशिक्षक म्हणून काम करणारा एखादा प्रशिक्षक दरमहा किमान दीड लाख वा त्याहून अधिक वेतन घेतो. एकंदरच या क्षेत्रात साहसी तरुणांना ती किती मोठी संधी आहे हे लक्षात येईल. आपल्याला कोणत्या प्रकारच्या साहसी खेळाचं प्रशिक्षण घ्यायचं आहे, हे अगोदर निश्चित करावं लागतं. त्यात त्या खेळाविषयीची आवड, तुमचा कल याबाबी सर्वप्रथम लक्षात घ्याव्या.



खेचाखेची

## समजत नाही

**गोपाल:** दरवर्षी मला एक प्रश्न पडतो.
**श्याम:** काय रे?
**गोपाल:** बघ ना. २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी टीव्हीवर पाकिस्तान आणि भारतातल्या युद्धावरील चित्रपट दाखवले जातात.
**श्याम:** मग त्याचं काय?
**गोपाल:** पण आपल्यावर तर इंग्रजांनी राज्य केलं होतं ना, त्यांनी आपल्याला पारतंत्र्यात ठेवलं होतं. मग असं का?

बालमानस

मित्रांनो; पाण्याचा हार्डनेस मोजण्याचं एक प्रमाण आहे. ग्रेन्स पर गॅलन (जीपीजी) किंवा मिलीग्रॅम्स पर लिटर या परिमाणात पाण्यात मिसळलेली खनिजं मोजतात. पाणी १ जीपीजी अथवा त्यापेक्षा कमी असेल तर ते सॉफ्ट वॉटर असतं. हे पाणी पिण्यासाठी सर्वोत्तम समजलं जातं. १ ते ३.५ जीपीजी असणारं पाणी मध्यम दर्जाचं समजलं जातं. ३ ते ५.७ जीपीजी असणारं पाणी बऱ्यापैकी हार्ड असतं. तर ७ ते १०.५ जीपीजी असणारं पाणी कमलीचं हार्ड असतं. हे पाणी प्यायलास काही शारीरिक समस्या उद्भवू शकतात. पाण्यामध्ये विरघळलेली ही खनिजं आपल्या पोटाचं अनेक पद्धतीने नुकसान करु शकतात.

डाएट मंत्रा

## उन्हाळ्यातला योग्य आहार

उन्हाळ्यात पचनसंस्थेशी संबंधित व्याधी डोकं वर काढतात. आहार अयोग्य असेल तर आजारांचं प्रमाण वाढतं. ते कमी करण्यासाठी आहारात अत्यावश्यक अशा काही घटकांची माहिती घ्यायलाच हवी.

✻ दुधी किंवा काकडीवर्गीय भाज्या तसंच कलिंगड अथवा खरबुजासारख्या फळांमध्ये जवळपास ९६ टक्के पाणी असतं. म्हणूनच डिहायड्रेशनची समस्या सतावत असेल तर आहारात या घटकांचा समावेश करायला हवा. कमी कॅलरीजयुक्त असल्यामुळे डाएट चार्टमध्ये त्यांचा समावेश करताना काळजी करण्याचं कारण नाही. ✻ उन्हाच्या त्रासापासून वाचण्यासाठी कांदा हे वरदान ठरतं. कांद्यात व्हिटॅमीन सी, बी-६ आणि मॅंगेनीज मोठ्या प्रमाणावर असतं. त्यात क्वैरसेटिन नावाचं अँटीऑक्सीडंट असतं जे उष्णतेच्या त्रासावर प्रभावी उपाय ठरतं. त्यामुळे सॅलडमध्ये कांद्याचा समावेश करावा. ✻ उन्हाच्या त्रासापासून वाचण्यासाठी कारलं लाभकारक ठरतं. कारल्यात कार्बोहायड्रेट, प्रोटीन आणि व्हिटॅमीन्स असतात. त्यामुळे आरोग्य आणि डाएट या दोहोंचं संतुलन साधणं शक्य होतं.



Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

समाचार
शुक्रवार, दि. २६ एप्रिल २०२४ पान ३

JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




प्रेक्षकांमध्ये फक्त दोनच माणसं दिसत आहेत हे खरं... आणि ते दोघे सुद्धा आपल्या कार्यकर्त्यांनी काल वाटलेल्या नोटा खोट्या व बनावट असल्याने बदलून घेण्यासाठी आलेले आहेत!!

विरोधातील सर्व याचिका न्यायालयाने फेटाळल्या

# ईव्हीएमवर मतदानाचा 'सुप्रीम' निर्णय

**नवी दिल्ली, दि. २६-** सर्वोच्च न्यायालयात ईव्हीएमच्या वापराला आव्हान देणाऱ्या याचिकांवर झालेल्या सविस्तर सुनावणीनंतर आज सुप्रीम कोर्टानं ईव्हीएम-व्हीव्हीपॅटविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर निकाल दिला. या सर्व याचिका फेटाळून लावताना न्यायालयाने मतदान ईव्हीएमवरच होईल, असं स्पष्ट केलं. तसेच, सर्व व्हीव्हीपॅट यंत्रांची मतदानानंतर चाचपणी करण्याची मागणीही न्यायालयाने फेटाळली आहे. या संदर्भात असोसिएशन फॉर डेमोक्रॅटीक दिफार्मसच्या अभय छाजेड आणि अरूणकुमार अग्रवाल यांनी याचिका दाखल केली होती.



न्यायमूर्ती खन्ना व न्यायमूर्ती दत्ता यांच्या खंडपीठासमोर या याचिकांची सुनावणी झाली. आम्ही या प्रकरणात दोन निर्देश दिले आहेत. उमेदवारांच्या चिन्हांची यंत्रांवर प्रक्रिया केल्यानंतर ती यंत्रे सीलबंद करण्यात यावीत. त्यानंतर प्रत्यक्ष मतदानापर्यंतच्या किमान ४५ दिवसांचा मधला कालावधी असायला हवा, असं न्यायमूर्ती खन्ना यांनी निकालात म्हटलं आहे.

दरम्यान निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत उमेदवारांना संबंधित ईव्हीएमची पूर्ण चाचपणी करण्याची मागणी करण्याचा अधिकार असेल. यानंतर तज्ज्ञ अभियंत्यांच्या पथकामार्फत ही तपासणी केली जाईल. यासाठी येणारा खर्च संबंधित उमेदवाराला उचलावा लागेल. जर ईव्हीएम मशीनशी छेडछाड केल्याचं निष्पन्न झालं, तर हा खर्च उमेदवाराला परत दिला जाईल, असं न्यायमूर्ती खन्ना यांनी दिलेल्या निर्देशांमध्ये नमूद केलं.

खंडपीठातील दुसरे न्यायमूर्ती दत्ता यांनी यावेळी व्यवस्थेवर थेट अविश्वास दाखवणं चुकीचं असल्याचं मत व्यक्त केलं. अंधपणे व्यवस्थेवर अविश्वास दाखवला तर त्याचा परिणाम विनाकारण संशय निर्माण करण्यामध्ये होऊ शकतो, असं न्यायमूर्ती दत्ता म्हणाले. यावेळी त्यांनी पेपर स्लिप मोजण्यासाठी यंत्रिक व्यवस्था राबवता येऊ शकते का? याची चाचपणी करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला दिले.

हवामान विभागाचा इशारा

## चार दिवस उष्णतेची लाट

**मुंबई, दि. २६-** आखाती देशातून गुजरातमार्गे मुंबईसह राज्यात वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे पुढील चार ते पाच दिवस उष्णतेची लाट येईल आणि कमाल तापमान सरासरीच्या तुलनेत तीन ते चार अंशांनी अधिक नोंदविले जाईल, अशी शक्यता हवामान अभ्यासकांनी वर्तविली आहे. त्यानुसार, मुंबईचे कमाल तापमान ३८ च्या आसपास, तर राज्यातील बहुतांशी शहरांचे कमाल तापमान ४० अंशापार नोंदविले जाण्याची शक्यता आहे.



लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी शुक्रवारी मतदान होत असताना, हवामान विभागाने अनेक राज्यांत उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. त्यामुळे मतदानासाठी घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय हवामान विभागाकडून पाच दिवसांसाठी पश्चिम बंगाल व ओडिशात उष्णतेचा रेड अलर्ट, तर बिहार व कर्नाटकमध्ये ऑरेंज अलर्ट दिला आहे. हवामानातील बदलामुळे कमाल तापमानाचा पारा वाढतो आहे. तीन दिवस उष्णतेच्या लाटेच्या झळा बसतील. मुंबईचे कमाल तापमान ३८ च्या आसपास नोंदविले जाईल.

## निवडक

### राज्यात ठिकठिकाणी ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड



**मुंबई, दि. २६-** महाराष्ट्रातील ८ लोकसभा मतदारसंघात आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडत आहे. सकाळी ७ वाजेपासून मतदानाला सुरुवात झाली आहे. अमरावती, अकोला आणि वर्ध्यात ईव्हीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे मतदान केंद्राबाहेर काही वेळ मतदारांना करावी लागली प्रतीक्षा लागली. ईव्हीएममध्ये बिघाड होताच निवडणूक अधिकाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. अमरावती शहरातील रुक्मिणीनगर येथील शाळा क्रमांक १९ मधील खोली क्रमांक ५ मध्ये ईव्हीएम बंद पडले. जवळपास १५ मिनिटे वोटिंग मशीन बंद पडले होते. त्यामुळे मतदारांचा चांगलाच खोळंबा झाला होता. अखेर ईव्हीएममधील तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यात आला. सध्या अमरावतीमध्ये मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू आहे.

## काँग्रेसचा जाहीरनामा देशाला फाळणीच्या दिशेने नेणारा - लक्ष्मण सावजी

**समाचार/नगर-दि.२६**

काँग्रेसचा जाहीरनामा धार्मिक तेढ निर्माण करणारा, देशाला पुन्हा फाळणीच्या दिशेने नेणारा आहे, असा आरोप भाजपचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी केला. नगर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांच्या प्रचारासाठी लक्ष्मण सावजी यांनी बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भाजप प्रदेश कामगार मोर्चाचे सरचिटणीस विक्रम नागरे, शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, माजी जिल्हाध्यक्ष भानुदास बेरड, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, महेश नामदे, नितीन शेलार आदी उपस्थित होते.

सावजी म्हणाले, अल्पसंख्याकांना आर्थिक मदत, शैक्षणिक लाभ, सार्वजनिक रोजगार, कौशल्यविकास क्षेत्रात अधिक संधी देण्याची हमी काँग्रेसने दिली आहे. मागासवर्गीय जाती-जमातीच्या आरक्षणासाठी ५० टक्के मर्यादा हटवण्याची, संपत्ती व उत्पन्नातील असमानता दूर करण्याच्या काँग्रेसच्या आश्वासनामुळे अतिरिक्त संपत्तीधारकांची संपत्ती अल्पसंख्याकांकडे वळवण्याचा छुपा हेतू उघड झाला आहे. काँग्रेसला देशातील सामाजिक व्यवस्थेची वीण नष्ट करायची आहे. परंतु भाजप काँग्रेसचा हा डाव यशस्वी होऊ देणार नाही. बहुसंख्याक तसेच दिनदलितांची संपत्ती मुस्लिमांना देणे व त्यांचे लागूलचालन करण्याचा विचार म्हणजे लोकांकडील अतिरिक्त संपत्ती काढून घेण्याची ही मूळ विचारसरणी माओवादी व नक्षलवाद्यांची आहे. ती काँग्रेस प्रत्यक्षात आणू पाहत आहे. त्यामुळेच काँग्रेस व महाविकास आघाडीला मत म्हणजे देशाच्या फाळणीला मत असेल, असाही आरोप सावजी यांनी केला. मोदी सरकारने गेल्या १० वर्षात जात व धार्मिक भेदभाव निर्माण करणारी एकही योजना राबवली नाही. त्या सर्वांना एकसमान लाभ देणाऱ्या होत्या. परंतु काँग्रेस बहुसंख्याकांना विरोध करत मुस्लिमांचे लागूलचालन करत आहे. कर्नाटकातील काँग्रेस सरकारने मुस्लीम समाजासाठी खास योजना राबवून त्याची सुरुवात केली आहे याकडे भाजप प्रवक्ता सावजी यांनी लक्ष वेधले.

ठेवीदारांचे ६० कोटी परत करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

## 'नगर अर्बन'ची १२.७८ कोटींची कर्जवसुली

**समाचार/नगर-दि.२६**



रिझर्व बँकेने नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा बँकिंग परवाना रद्द केल्यानंतर केंद्र शासनाने बँकेवर नोव्हेंबर २०२३ मध्ये अवसायक म्हणून एनसीडीसीचे संचालक गणेश गायकवाड यांची नियुक्ती केली. दरम्यानच्या पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये २३ एप्रिल अखेर बँकेच्या थकीत कर्जापैकी १२ कोटी ७८ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत.

याच बरोबर पहील्या व दुसऱ्या टप्प्यात १७२०० ठेवीदारांचे २९३.५७ कोटी रुपये डीआयसीजीसीच्या माध्यमातून परत करण्यात आले असून १४४८५ ठेवीदारांच्या क्लेम फॉर्मची पुर्तता झालेली असून त्यांचे ६० कोटी रुपये डीआयसीजीसीच्या माध्यमातून लवकरच परत करण्यात येणार असल्याची माहीती बँक प्रशासनाकडून देण्यात आली. नवीन आर्थिक वर्षामध्ये थकीत कर्ज वसुलीची प्रक्रिया अधिक तीव्र करण्यात येणार असून अशा कर्जदारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. संभाव्य कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व थकीत कर्जदारांनी आपली थकबाकीची रक्कम लवकरात लवकर भरून बँक प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे. त्याचबरोबर सर्व खातेदार व ठेवीदार यांनी आपापले केवायसी कागदपत्र नजीक शाखेत जमा करून ठेवी परत मिळवण्यासाठी क्लेम फॉर्म देखील लवकरात लवकर भरून द्यावेत असे आवाहन देखील गायकवाड यांनी केले आहे. थकीत कर्जाची वसुली करून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत करण्यासाठी बँक प्रशासन प्रयत्नशील असल्याचे देखील यावेळी गायकवाड यांनी सांगितले.

डॉ.परवेश अशरफी यांचा अर्ज दाखल; तिरंगी लढत होणार

## 'एमआयएम'मुळे महाविकास आघाडी अडचणीत

**समाचार/नगर-दि.२६**

नगर दक्षिण लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या रणांगणात गुरवारी नवा उमेदवार दाखल झाला आहे. एमआयएम तर्फे डॉ. परवेश अशरफी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले डॉ. अशरफी निवडणुकीच्या मैदानात आल्याने अल्पसंख्यांक मतांवर डोळा ठेऊन असलेल्या महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. डॉ. अशरफीच्या रुपाने महाविकास आघाडीच्या अडचणी वाढल्या असल्याची चर्चा सध्या चांगलीच रंगली आहे. दक्षिण नगर लोकसभा मतदार संघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांमुळे निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असताना त्यात आता 'एमआयएम'ने उडी घेतल्याने या निवडणुकीला चांगलीच रंगत येणार आहे. महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांनी आधीच महविकास आघाडीवर कुरघोडी करत प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडीला उमेदवार सापडत नसल्याने आयता उमेदवार घेऊन निलेश लंके यांना मैदानात उतरविले. पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. कारण डॉ. सुजय विखे यांनी तोपर्यंत संपुर्ण मतदार संघ पातांक्रित करत मतदारांच्या गाठी भेटी वाढवत आपले वातावरण तयार केले. यामुळे महाविकास आघाडीने मतदार संघातील अल्पसंख्याक समाजावर आपले लक्ष केंद्रीत करत त्यांना आपल्या गळाला लावण्याचा जोरदार प्रयत्न चालवला आहे. पण आता खुद्द 'एमआयएम' ने आपला उमेदवार रिंगणात उतरविण्यात महाविकास आघाडीच्या गोटात चिंतेची लाट पसरली आहे. एम आय एम ने दिलेले उमेदवार डॉ. परवेश अशरफी हे सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. महाविकास आघाडीने केवळ अल्पसंख्यांक मतांचा आपल्या राजकीय फायद्यासाठी वापर केला असून राज्यात एकही अल्पसंख्याक उमेदवार दिला नाही. यामुळे अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण ही निवडणूक लढवत असल्याचे डॉ. अशरफी यांनी सांगितले. त्यांना जनता आता किती साथ देणार हे ४ जूनला समोर येईल. पण दक्षिण लोकसभा मतदार संघात एमआयएम दाखल झाल्याने तिरंगी लढत पहायला मिळणार आहे.

## डॉ. वसंत हेबाळकर यांचे निधन

**समाचार/नगर-दि.२६**



प्रा. डॉ. वसंत हेबाळकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. येथील विद्या प्रतिष्ठान संचालित अध्यापक कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून २५ वर्षे ते कार्यरत होते. त्यांची लहान मुलांसाठीची कविता आणि गोष्टींची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. निवृत्ती नंतरही लिखाणाचा छंद जोपासत त्यांनी गुजराथी दत्तबावनीर्चे मराठीत भाषांतर करून त्याचे पुस्तक प्रसिद्ध केले. वयाच्या नव्वदाव्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात १ मुलगा, सून ३ मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

कमळ पुन्हा फुलणार की तुतारी वाजणार?

# नगर दक्षिणेत सुजय विखे-निलेश लंके लढत लक्षवेधी ठरणार!

नंदकुमार सातपुते

महाराष्ट्राच्या राजकारणात नेहमीच महत्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि राजकीयष्ट्या अत्यंत महत्वाच्या अशा अहमदनगर जिल्ह्यातील लोकसभेच्या नगर दक्षिण आणि शिर्डी या दोन्ही जागांची यंदाची निवडणूक लक्षवेधी ठरणार आहे. त्यातही सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीसाठी प्रतिष्ठेच्या ठरलेल्या नगर दक्षिण लोकसभेच्या निवडणुकीकडे तर केवळ जिल्ह्याचेच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. भाजपाचे या मतदार संघातील विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे हे महायुतीचे उमेदवार म्हणून सलग दुसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत तर महाविकास आघाडीकडून खा. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार निलेश लंके यांनी आपले राजकीय भवितव्य पणाला लावत आणि आमदारकीचा राजीनामा देत निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकले आहेत. प्रचाराचा धुरळा उडालेल्या या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. विखे आणि लंके यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर प्रचारास आणखी धार आली आहे. दोन्ही बाजूंनी नगर दक्षिण मतदार संघाच्या विकासाच्या मुद्यावर लढविली जाणारी ही निवडणूक अटीतटीचीच होईल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत.

लोकसभेची आताची निवडणूक अनेक अर्थाने वैशिट्यपूर्ण ठरणारी आहे. गेल्या दोन वर्षात शिवसेना फुटली, राष्ट्रवादी दुभंगली. राज्यात सत्तेवर असलेल्या भाजप-शिवसेना-रिपाइं महायुतीत अजित पवारांची राष्ट्रवादी सहभागी झाली तर दुसरीकडे काँग्रेस-शिवसेना ठाकरे गट-शरद पवारांची राष्ट्रवादी-शेकाप यांची महाविकास आघाडी झाली. आताच्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडी यांच्यातच मोठी चुरस आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचे ध्येय ठेवत महायुतीने विशेषतः भाजपाने महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागांपैकी ४५ पेक्षा अधिक जागा जिंकण्याचे उद्दिष्टय ठेवले आहे तर महाविकास आघाडीने राज्यात निम्म्यापेक्षा अधिक जागा जिंकण्याचा दावा केला आहे. दोन्ही बाजूंनी त्यादृष्टीने प्रचारयंत्रणा राबविली जात आहे. खरे तर अहमदनगर





जिल्हा हा जुन्या काळात काँग्रेसचा बालेकिल्ला. मात्र गेल्या २५ वर्षात हे चित्र बदलले. जिल्ह्यातील नगर दक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघात भाजपा-शिवसेना युतीने जम बसविला. नगर दक्षिणेत २००४ चा एकमेव अपवाद वगळता सातत्याने चारवेळा भाजपाचा उमेदवार विजयी झाला तर शिर्डीत आधी भाजपा आणि नंतर शिवसेनेने सतत विजय मिळविला. आताच्या २०२४ च्या निवडणुकीतही महायुतीने या दोन्ही मतदारसंघात विजयाचा दावा केला आहे. महाविकास आघाडीत नगर दक्षिणेची जागा खा. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे तर शिर्डीची जागा शिवसेनेच्या ठाकरे गटाकडे गेली. १९९९ मध्ये कॉंगेस-राष्ट्रवादीची आघाडी झाल्यानंतर नगर दक्षिण मतदारसंघ सातत्याने राष्ट्रवादीकडे राहिला तर शिर्डी मतदारसंघ काँग्रेसकडे गेला. गेल्या ५ लोकसभा निवडणुकांत नगर दक्षिणेत राष्ट्रवादीला २००४ चा एकमेव अपवाद वगळता चार निवडणुकीत भाजपाकडून सतत पराभव पत्करावा लागला. शिर्डीतही काँग्रसला युतीकडून पराभवाचा सामना करावा लागला. आताच्या निवडणुकीत तर जुन्या काळात काँग्रेसचा बालेकिल्ला राहिलेल्या नगर जिल्ह्यात काँग्रेसचे पंजा चिन्हच गायब झाले आहे. महाविकास आघाडीत शिर्डीची जागा शिवसेनेच्या ठाकरे गटाकडे असल्याने काँग्रेस आधाडी घर्म म्हणून त्यांच्या प्रचारात सक्रिय आहे. इकडे दक्षिणेतही जागा भाजपकडे असल्याने उपमुख्यमंत्री अजितदादांच्या राष्ट्वादीचे घड्याळ चिन्हही या निवडणुकीत राहिले नाही. अजितदादांची राष्ट्रवादी भाजपच्या प्रचारात सक्रिय सहभागी झाली आहे.

नगर दक्षिणेत भाजपाचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे हे गेल्या पाच वर्षात नगर दक्षिणेत केलेल्या विकासकामांच्या जोरावर दुसऱ्यांदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. केंद्रातील भाजप आघाडी सरकार आणि राज्यात सत्तेवर असलेल्या भाजप-शिवसेना-राष्ट्रवादीच्या महायुतीची ताकद त्यांच्यामागे आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे यांच्याकडे असल्याने दक्षिणेतील विविध विकासकामांना मोठी चालना मिळाल्याचे खा. विखे सांगतात. नगरची विस्तारित विळद एमआयडीसी, शिर्डी एमआयडीसी आणि श्रीगोंदा एमआयडीसीला राज्य सरकारच्या माध्यमातून तत्वतः मंजुरी खा. विखे यांनी मिळविली आहे. नगर शहरातील अवजड वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी माजी खा. दिलीप गांधी यांनी मंजुरी मिळविली होती. नगर शहराच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या या उड्डाणपुलाचे काम खा. विखे यांनी सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करून मार्गी लावले. याकामी त्यांना नगर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांची महत्वाची साथ मिळाली. उपमुख्यमंत्री अजित पवार महायुतीत सहभागी होण्यापूर्वी जवळपास अडीच तीन वर्षे खा. सुजय विखे आणि आ. संग्राम जगताप यांची शहर विकासाच्या मुद्यावर राहिलेली ही पक्षविरहीत युती चर्चेचा विषय ठरली. आता दोघेही महायुतीत असल्याने आ. जगताप यांनी खा. विखे यांचा प्रचारात सक्रिय सहभाग घेतला आहे. कर्जत-जामखेडमध्ये माजी मंत्री आ. राम शिंदे यांची **(पान ४ वर)**

(पान ३ वरून)

# नगर दक्षिणेत सुजय विखे-निलेश लंके लढत लक्षवेधी ठरणार!

विखे पिता-पुत्रांबाबत असलेली नाराजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत झालेल्या बैठकीत दूर झाल्याने आ. शिंदे यांनीही खा. विखे यांच्या विजयासाठी कंबर कसली आहे. श्रीगोंद्यात आ. बबनराव पाचपुते, श्रीगोंदा साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती अनुराधा नागवडे, शेवगाव-पाथर्डीत आ. मोनिका राजळे, माजी आ. चंद्रशेखर घुले, राहुरी-नगर तालुक्यात जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले, पारनेर तालुक्यात भाजप पदाधिकाऱ्यांसह महायुतीतील शिवसेना-राष्ट्रवादीचे प्रमुख पदाधिकारी खा. विखे यांच्यासाठी सक्रिय झाले आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर आ. लंके हे अजित पवारांसमवेत महायुतीत गेल्याने जिल्हा परिषदेचे माझी उपाध्यक्ष सुजित झावरे यांनी खा. शरद पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत पारनेरमध्ये झावरे हे शरद पवारांच्या राष्ट्वादीचे उमेदवार असतील, अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने निलेश लंके यांनाच दक्षिणेत उमेदवारी दिल्याने सुजित झावरे यांनी या निवडणुकीत भाजपचे उमेदवार खा. सुजय विखे यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात झावरे यांनी ही भूमिका घेतली. या निवडणुकीसाठी खा. सुजय विखे यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह महायुतीचे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी यावेळी हजेरी लावली. या निवडणुकीसाठी खा. विखे यांची प्रचारयंत्रणा कामाला लागली आहे. आपल्याकडे नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट आहे, केंद्र सरकारच्या माध्यमातून विकासाचे प्रलंबित प्रश्न सोडवू, असे सांगत खा. विखे प्रचार करीत आहेत. पारनेर-नगर-राहुरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्वादीचे आमदार निलेश लंके यांनी गेल्या दोन-अडीच वर्षांपासून नगर दक्षिणेत खासदारकीची निवडणूक लढविण्याची तयारी चालविली होती. नगर दक्षिणेच्या सर्वच तालुक्यांत संपर्क वाढवितानाच त्यांनी खा. सुजय विखे यांच्याविरोधात भूमिका घेतली. त्यामुळे राष्ट्रवादी फुटण्यापूर्वी लंके हेच दक्षिणेत महविकास आघाडीचे उमेदवार असतील, अशी चर्च होत राहिली. मध्यंतरी राष्ट्रवादी फुटली. या पक्षाचे दिग्गज नेते अजित पवार आपल्याबरोबर पक्षाचे ४० आमदार घेऊन राज्यात सत्तेवर असलेल्या महायुतीत सामील झाले. अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री झाले. पारनेरचे राष्ट्रवादी आमदार निलेश लंके यांनीही त्यावेळी मतदारसंघाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवारांना साथ देण्याची भूमिका घेतली. लोकसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर मात्र लंके यांनी खा. पवारांच्या राष्ट्रवादीची वाट धरली. त्यामध्ये शिरूरचे खा. अमोल कोल्हे यांची भूमिकाही महत्वाची ठरली. आ. लंके यांच्या पत्नी, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके याही लोकसभेसाठी इच्छुक होत्या. त्यामुळे उमेदवारी कुणाला मिळणार? याविषयी उत्सुकता होती. मात्र शेवटच्या टप्प्यात पवारांच्या राष्ट्रवादीची उमेदवारी आ. लंके यांनाच जाहीर झाली. आपल्या विद्यमान आमदारकीचा राजीनामा देत लंके यांनी कोणतेही शक्तिप्रदर्शन न करता उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर लंके यांनी नगर दक्षिणेतील सर्व तालुक्यांतून जनसंवाद यात्रा काढली. मतदारसंघातील त्या-त्या तालुक्यातील महाविकास आघाडी नेत्यांच्या गाठीभेटी घेत जनतेशी संवाद साधला. या जनसंवाद यात्रेचा समारोप नगरमध्ये शक्तिप्रदर्शनाने झाला. खा. शरद पवार, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या दक्षिणेतील प्रमुख नेत्यांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावली. जनशक्ती विरुद्ध धनशक्ती अशी आपली लढाई असल्याचे लंके सांगत आहेत. दक्षिणेतील विकासाचे वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन लंके यांनी दक्षिणेतील मतदारांना दिले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पारनेर मतदारसंघात शिवसेनेचे मातब्बर उमेदवार विजयराव औटी यांचा धक्कादायक पराभव करून मताधिक्याने निवडून आलेल्या निलेश लंके यांनी कोरोना काळात सहकाऱ्यांच्या मदतीने कोविड सेंटरच्या माध्यमातून केलेली रुग्णसेवा केवळ नगर जिल्हाच नव्हे तर राज्यात चर्चेचा विषय ठरली. साधे राहणीमान आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होणारा लोकप्रतिनिधी अशी त्यांची प्रतिमा लोकांना भावली. स्वतःच्या मतदार संघासह नगर जिल्हा आणि राज्यात कुठेही गेले तरी लंके यांच्याभोवती गर्दी होऊ लागली. नगर दक्षिणेत वाढत्या संपर्कामुळे त्यांनी लोकसभेची चाचपणी करीत तशी तयारीही सुरू केली. राष्ट्रवादी दुभंगली तरी लंके यांची लोकसभा लढविण्याची इच्छा कायम होती. खा. शरद पवार यांनीही हे हेरले होते. त्यातूनच लंके यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची साथ सोडत खा. पवारांच्या राष्टवादीत प्रवेश केला आणि नगर दक्षिणेत खा. सुजय विखे यांच्याविरोधात निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. पारनेर स्वतःचे होम ग्राऊंड, राहुरीत आ. प्राजक्त तनपुरे, कर्जत-जामखेडमध्ये आ. रोहित पवार, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, श्रीगोंद्यात घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस, पाथर्डी-शेवगावमध्ये प्रताप ढाकणे, नगर शहरात राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते दादा कळमकर आदिंची सक्रिय साथ त्यांना मिळत आहे. मध्यंतरी लंके यांची भाजपचे नेते, माजी मंत्री आ. राम शिंदे यांच्याशी जवळीक वाढली होती. आ. रोहित पवार यांचा मतदारसंघ कर्जत-जामखेड मतदारसंघ. याच मतदार संघातील आपल्या कट्टर विरोधकांशी निलेश लंके यांची वाढती जवळीक आ. पवार यांना चांगलीच खटकली होती. त्यातूनच लंके यांना खा. पवार यांनी पक्षाची उमेदवारी दिल्यानंतरही आ. रोहित पवार त्यांच्याशी काहीसे फटकूनच होते. पक्षात वरिष्ठांशी झालेली चर्चा आणि जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून आ. पवार यांची नाराजी दूर करण्यात लंके यांना यश मिळाले.

पवार-विखे राजकीय संघर्ष अहमदनगर जिल्हाच नव्हे तर राज्याला नवा नाही. गेली अनेक वर्षे हा संघर्ष नगर जिल्हा आणि राज्याने पहिला आहे. आताच्या लोकसभा निवडणुकीतही पवार-विखे राजकीय संघर्ष चालूच राहिला आहे. भाजपाचे उमेदवार खा. सुजय विखे यांच्याविरोधात खा. शरद पवार यांनी निलेश लंके यांना उमेदवारी देऊन नगर दक्षिणेच्या निवडणुकीत रंगत आणली आहे. लंके यांनी या निवडणुकीत तशी वातावरण निर्मिती तर केली आहे. दोन्ही बाजूंनी नगर दक्षिणेच्या विकासाच्या मुद्यावरच लढविल्या जाणाऱ्या या निवडणुकीत प्रचाराचा धुरळा उडाला आहे. कोणी काय केले? आणि काय नाही केले, यावर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. निवडणुकीच्या मतदानाला अजून पंधरा दिवसांपेक्षा अधिक कालावधी आहे. या काळात महायुती आणि महविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या दक्षिणेत सभा होतील, बैठका होतील.आरोप-प्रत्यारोपांची राळ उडेल. त्यामुळे मतदानापर्यंत अजून पुलाखालून बरेच पाणी वाहून जाणार आहे. या परिस्थितीत नगर दक्षिणेतून खा. सुजय विखे सलग दुसऱ्यांदा लोकसभेत जाणार की, निलेश लंके त्यांना दिल्लीला जाण्यापासून रोखणार? याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

# घोसपुरी येथे उद्या भरणार जंगी कुस्त्यांचे मैदान



**समाचार/नगर-दि.२६**

नगर तालुक्यातील घोसपुरी येथील श्री पद्मावती देवीच्या वार्षिक यात्रोत्सवास शुक्रवार (दि.२६) पासून प्रारंभ होत असून हा यात्रोत्सव २ दिवस चालणार आहे. ग्रामस्थांनी या निमित्ताने या वर्षी प्रथमच कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित केले असून शनिवारी (दि.२७) नामवंत मल्लांच्या कुस्त्या होणार आहेत.

घोसपुरी येथील श्री पद्मावती देवस्थान जागृत असून येथील काच मंदिर सर्वत्र प्रसिद्ध आहे. देवीचा वर्षातून २ वेळा वार्षिक यात्रोत्सव होत असतो. यामध्ये नवरात्र आणि दुसरा यात्रोत्सव चैत्र पौर्णिमेच्या तिसऱ्या दिवशी होत असतो. यावर्षी शुक्रवारी हा यात्रोत्सव होणार असून यात सायंकाळी देवीच्या आरती नंतर गावातून छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री मनोरंजनासाठी ऑर्केस्ट्रा आयोजित करण्यात आला आहे. शनिवारी (दि.२७) दुपारी ३ पासून कुस्त्यांचे मैदान आयोजित करण्यात आले आहे. ग्रामस्थ दरवर्षी लोकवर्गणी जमा करून कुस्ती मल्ल विद्येला प्रोत्साहन देण्यासाठी कुस्त्याचा आखाडा भरवत असतात, मात्र या वर्षी प्रथमच नामवंत मल्लांचे मैदान आयोजित करण्यात आले आहे. देवीचा यात्रोत्सव आणि कुस्त्यांचे मैदान यशस्वी करण्यासाठी यात्रा कमेटी व ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत.



# बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठानतर्फे महाप्रसादाचे वाटप

**समाचार/नगर-दि.२६**

शहरातील बागडपट्टी येथील बागडपट्टीचा राजा प्रतिष्ठान यांच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त भव्य महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

बागडपट्टी येथे पुरातन दक्षिणमुखी हनुमान मंदिर आहे. या मंदिराचे प्रमुख प्रदीप वाव्हळ यांनी सकाळी पुजा-पाठ करून भाविकांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. रात्री महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो नागरिक उपस्थित होते.

दिलदार सिंग (बीर) यांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी विविध सामाजिक, धार्मिक उपक्रम राबविले जात असतात. रक्तदान शिबिर व वह्या पुस्तके वाटप व गोरगरिबांना मदत करणे असे विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम राबवत असतात. दिलदारसिंग बीर यांचे भाषण झाले.

# विचार करायला भाग पाडणारा 'जुनं फर्निचर'चा ट्रेलर

**सिनेरंग**




गेल्या बऱ्याच दिवसांपासून जुनं फर्निचर या सिनेमाची चर्चा सुरू आहे. नुकताच या सिनेमाचा ट्रेलरही प्रदर्शित झाला. काय अपेक्षा आहेत आमच्या अशा त्यांच्याकडून... दिवसातून एकदा आमच्या खांद्यावरून हात फिरवून विचार ना.. आई कशी आहेस? बाबा कसे आहात? मन सुन्न करणारे हे वाक्य नकळत डोळ्यांच्या कडा पाणावणारे आहे. आपल्याकडे अनेकदा वयस्कर व्यक्तींना आऊटडेटेड, अडगळीतले सामान असे म्हटले जाते. परंतु याच सामानाची किंमत आणि ताकद काय आहे, हे सांगणारा चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे.

महेश वामन मांजरेकर दिग्दर्शित 'जुनं फर्निचर' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच दिमाखात पार पडला. या सोहळ्याला अधिक रंगात आणण्यासाठी वैभव जोशी यांच्या 'सोबतीचा करार' या संगीत मैफलचेही आयोजन यावेळी करण्यात आले. यात स्वप्नील बांदोडकर, केतकी माटेगावकर, पवनदीप राजन यांचाही सहभाग होता. यावेळी महेश मांजरेकर यांनी 'काय चुकले सांग ना?' या मनाला स्पर्शून जाणाऱ्या गाण्याच्या काही ओळी गायल्या.

'जुनं फर्निचर... या म्हाताऱ्याला अडवूनच दाखवा! ट्रेलरवरूनच हा चित्रपट ज्येष्ठ नागरिकांच्या अस्तित्वावर भाष्य करणारा आहे, हे कळतेच. मुलांप्रती असलेल्या कर्तव्यांमध्ये आपण कमी पडणार याची चिंता आईवडिलांना नेहमीच असते. परंतु तीच चिंता, काळजी, जबाबदारी आई वडिलांच्या म्हातारपणात मुलं बजावतात? वृद्धापकाळात मुलांकडून चार प्रेमाचे शब्द ऐकण्याची इच्छा असते. ती इच्छा ही पिढी पूर्ण करू शकत नसेल, तर आई वडिलांनी या वयात कोणाकडून प्रेमाची अपेक्षा ठेवावी, असा प्रश्न ट्रेलर पाहून मनात उद्भवतो. आपल्या पोटच्या मुलावरच आईच्या मृत्यूचा आरोप गोविंद पाठक यांनी लावला असून आता या प्रकरणाचा निकाल काय लागणार, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.

# डिश टीव्हीची 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवांसह नवी क्रांती

**टेलीनामा**




डिश टीव्हीने भारतातील मनोरंजन अनुभवाची पुनर्परिभाषित करण्यासाठी एक अग्रगण्य पुढाकार घेतला आहे. या उपक्रमात, आघाडीच्या डीटीएच प्रदात्यांचे 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवांची अभूतपूर्व ऑफर जाहीर केली आहे. लाँच उद्योगात एक नवीन उदाहरण प्रस्थापित करत आहे, ग्राहकांना कोणत्याही स्क्रीनवर, कुठेही, कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय टीव्ही आणि ओटीटी कॉन्टेन्टमध्ये प्रवेश देत आहे. हे सुविधा, लवचिकता आणि सुधारित मनोरंजन पर्याय सुनिश्चित करते, ज्यामुळे ग्राहकांचा पाहण्याचा अनुभव आणखी वाढतो.

'डिश टीवी स्मार्ट+' सर्व्हिसेससह, नवीन आणि विद्यमान ग्राहकांसह सर्व डिश टीव्ही आणि डी२एच ग्राहक त्यांच्या निवडलेल्या टीव्ही सबस्क्रिप्शन पॅकसह लोकप्रिय ओटीटी प्सचा आनंद घेऊ शकतात. 'डिश टीव्ही स्मार्ट+' सेवा इकोसिस्टम कधीही, कुठेही कोणत्याही स्क्रीनवर वॉचो - ओटीटी सुपरप, सेट-टॉप बॉक्सेससह स्मार्ट डिव्हाईसेस आणि स्मार्ट अँड्रॉयड एसटीबीच्या माध्यमातून तुमच्या मनोरंजनाचा आनंद घ्या. डिश टीव्ही, टॉप टीव्ही आणि मोबाइल ओरिजिनल इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स (ओईएम) सोबत त्यांच्या सेवा या उपकरणांमध्ये अखंडपणे समाकलित करण्यासाठी, एक वर्धित वापरकर्ता अनुभव प्रदान करेल.

या दूरदर्शी प्रस्तावाचा प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी, डिश टीव्हीने टेलिव्हिजन, डिजिटल, प्रिंट आणि कॉर्पोरेट आऊटरीचसह विविध चॅनलवर एक व्यापक विपणन मोहीम सुरू केली आहे, ज्याचा उद्देश मनोरंजनाचा संदेश कोणत्याही स्क्रीनवर पोहोचवायचा आहे.विद्यमान ग्राहकांसाठी, डिश टीव्ही त्याच्या चॅनल आणि प्लॅटफॉर्मचा फायदा घेईल, पुश नोटिफिकेशन, इन-प नोटिफिकेशन आणि ईमेलरचा वापर करेल. दरम्यान, नवीन ग्राहकांसाठी, ऑफरची व्यापक दृश्यता आणि जागरूकता सुनिश्चित करण्यासाठी टीव्ही आणि डिजिटल चॅनलवर भर दिला जाईल.

## शब्दखेळ - १५८

खाली दिलेल्या चौकोनात लेखक शिवाजी सावंत यांच्या १० पुस्तकांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मृ | तो | छा | वा | सा | ह्य | पी | क |
| त्युं | जो | उ | जी | डू | ज्ञ | ला | व |
| ज | अ | य | ण | ल | भा | रा | ड |
| य | मृ | या | प | ढ | ऊ | अ | से |
| यु | त | ती | से | त | कु | जे | मो |
| गं | वे | मा | मी | डे | उ | य | रा |
| ध | ल | व | वा | ए | का | का | व |
| र | कां | च | न | क | ण | रा | ळा |

## शब्दखेळ - १५७ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सी | वा | ता | क | भा | य | ख | ळा |
| एस | शी | श्री | क | म | मुं | मी | पे |
| टी | ल | स्सी | ड्ड | ल | ब | मा | अं |
| स | च | को | णी | प | ई | वा | धे |
| वां | र्च | दा | री | नी | सें | मा | री |
| द्रे | गे | द | इ | र | ट्र | न | वि |
| र | ट | र | ची | से | ल | णी | ष्णू |
| घा | ट | को | प | र | लि | कु | र्ला |

# 'आज्ञीबाई जोरात' नाटकाद्वारे पुष्कर गाठणार वेगळी उंची'

**नाट्यरंग**



अभिनेता पुष्कर श्रोत्री हॅप्पी गो लकी' स्वभावामुळे प्रत्येकाला जवळचे वाटतात. चित्रपट, मालिका, नाटक अशा साऱ्या माध्यमांमध्ये लीलया वावरणाऱ्या पुष्करच्या अभिनय कारकिर्दीत आज्ञीबाई जोरात' या नाटकाने भन्नाट योग जुळवून आणला आहे. अभिनेता पुष्कर श्रोत्री यांचा ३० एप्रिलला वाढदिवस असतो. यंदा आपला ५५वा वाढदिवस साजरा करत असताना याच दिवशी रंगभूमीवरील आपल्या ५५ व्या नाटकाचा शुभारंभ आज्ञीबाई जोरात' या नाटकाने करणार आहे. आपल्या ३२ वर्षाच्या अभिनय कारकिर्दीत रसिकांची मनं जिंकणारे पुष्कर या नाटकात 'अतरंगी' भूमिकेत दिसणार आहे. या नाटकाद्वारे पुष्कर वेगळी उंची' गाठणार आहेत. ती उंची कशी गाठणार? हे पाहण्यासाठी आज्ञीबाई जोरात' हे नाटक पहावं लागणार आहे. 'पहिल्यांदाच बालनाट्यात काम करायला मिळणं आणि वेगळा रोल जो मला वेगळ्या उंचीवर नेणार आहे. ते करण्यासाठी उत्सुक असल्याचे पुष्कर यांनी सांगितले'. माझ्यासाठी ३० एप्रिल तारीख खास आहेच पण आमच्या आज्ञीबाई जोरात' या नाटकासाठी सुद्धा तारीख खास ठरावी. नाट्यरसिकांनी उत्तम प्रतिसाद देत आज्ञीबाई जोरात'चे जोरात स्वागत करावे, अशी आशा पुष्कर श्रोत्री यांनी व्यक्त केली. लेखक-दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन आज्ञीबाई जोरात' हे नवं कोरं AI बालनाट्य रंगभूमीवर घेऊन येतायेत. जिगीषा-अष्टविनायक संस्थेची निर्मिती असलेल्या आज्ञीबाई जोरात' या नाटकात सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत, पुष्कर श्रोत्री, जयवंत वाडकर, मुग्धा गोडबोले, अभिनय बेर्डे अशी कलाकारांची फळी आहे. हे नाटक विनोदाच्या अंगानं जाणारी फँटसी आहे. दिलीप जाधव, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी या नाटकाचे निर्माते आहेत. नेपथ्य प्रदीप मुळ्ये तर वेशभूषेची जबाबदारी कल्याणी कुलकर्णी-गुगळे यांनी सांभाळली आहे. संगीत सौरभ भालेराव तर नृत्यदिग्दर्शन सुभाष नकाशे यांचे आहे.

**लोकरंजन**

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## सारोळा कासार शाळेत प्रवेश मेळावा

# मंथन व ध्येय परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही गौरव

समाचार/नगर-दि.२६

जिल्हा परिषदेच्या सारोळा कासार प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, नवगतांचे स्वागत, इयत्ता चौथीचा निरोप समारंभ व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ऐश्वर्य मैड व कर्मवीर विद्यालयाचे प्राचार्य संपत काळे तसेच व्यवस्थापन समिती सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. इयत्ता पहिलीचे सर्व मुलांचे प्रवेश निश्चित करण्यात येऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच सर्व मुलांची नावनोंदणी,



शारीरिक, बौद्धिक विकास, सामाजिक व भावनिक विकास, भाषा विकास, गणन पूर्व तयारी, आदी बाबीची चाचपणी करण्यात आली.

सर्वांचा आवडता सेल्फी पॉईंट ज्याचा सर्वांनी आनंद घेतला. त्याचप्रमाणे मंथन परीक्षेत गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेल्या सर्व मुलांचा सत्कार करण्यात आला. मंथन परीक्षेत गुणवत्ता यादीत ५ विद्यार्थी आले असून तर शाळेचा १०० टक्के निकाल लागला आहे. त्यामध्ये इयत्ता पहिली प्रियल केतन कडूस केंद्रात ५ वा, जिल्ह्यात २० वा, राज्यात २५ वा क्रमांक. इयत्ता दुसरी रुंजी जीवन हारदे केंद्रात प्रथम, जिल्ह्यात ३ रा तर राज्यात ८ वा क्रमांक, तसेच ध्येय स्पर्धा परीक्षा प्रथम क्रमांक. संस्कृती नवनाथ धामणे केंद्रात ३ रा, जिल्ह्यात १५ वा, राज्यात २१ वा क्रमांक, शिवतेज संदीप भोसले, शौर्य सचिन कडूस, इयत्ता तिसरी –अर्चित सुनील धामणे केंद्रात २ रा,जिल्ह्यात १४ वा,राज्यात १९ वा क्रमांक, श्रद्धा दीपक कडूस केंद्रात ६ वा, जिल्ह्यात ३२ वा, राज्यात ३७ वा क्रमांक, श्रेयस अतुल काळे, अनन्या ज्ञानेश्वर काळे, प्रणव विलास झेंडे यांनी मंथन व ध्येय परीक्षेत चांगले गुण मिळवले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे शाळा व्यवस्थापन समिती, पालकांच्या वतीने व अभिनंदन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी समिती अध्यक्ष ऐश्वर्य मैड, उपाध्यक्ष रूपाली हारदे, सदस्य संजय धामणे, महिमा नगरे, पूजा धामणे, अतुल काळे, दीपक कडुस, पालक नवनाथ कडूस, प्राचार्य संपतराव काळे, प्रा. दादासाहेब भालसिंग, प्रा.सुखदेव मुरूमकर, भारती साळवे, कल्पना भोसले, रूपाली काळे, लीलाबाई शिर्के उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक वैजीनाथ धामणे, शिक्षक बाबासाहेब धामणे, ज्योती धामणे, सविता लोंढे, अंगणवाडी सेविका भारती साठे, मंदाताई कडूस सुनिता कोठूळे, उषा काळे आदींनी परिश्रम घेतले.

# वादळी पावसाचा शहरासह चार तालुक्यांना तडाखा

समाचार/नगर-दि.२६

जिल्ह्यात बुधवारी सायंकाळनंतर झालेले वादळी वारे व अवकाळी पावसाने एकाचा बळी घेतला तर वृद्धेसह चौघेजण जखमी झाले. वीज पडून ३ गाईंचाही मृत्यू झाला. ६८ घरांची पडझड झाली. केळी, लिंबू, डाळिंब, आंबा व चिकूच्या बागांना पावसाचा फटका बसला.

वादळी पावसाचा नगर शहरासह पाथर्डी, शेवगाव, कर्जत व जामखेड तालुक्याला तडाखा बसला. नगर शहरात रात्री १० च्या सुमारास अचानक वादळी वारे वाहू लागले व काही क्षणातच पावसाने झोडपून काढले. अनेक ठिकाणची झाडे उन्मळून पडली. सखल भागात पाणी साचले होते. दिवसभर जाणवणारा विलक्षण उकाडा पावसानंतर कमी होऊन हवेत थंडावा निर्माण झाला होता. मात्र त्यानंतर गुरुवारी सकाळपासून पुन्हा प्रचंड उकाडा निर्माण झाला.

जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे विहिरीचे डबर अंगावर कोसळून संदीप लहू खंडागळे (३०) याचा मृत्यू झाला तर वडगाव येथील घराचे पत्रे उडून कौसा बाजीराव जवरे (७०) हिच्यासह अन्य तिघे जखमी झाले. कर्जत तालुक्यातील रेहेकुरी, पाथर्डी तालुक्यातील मिरी व शेवगाव येथे वीज पडून प्रत्येकी एका गाईचा मृत्यू झाला. कर्जतमध्ये २१ घरांची अंशत: पडझड झाली तर शेवगाव तालुक्यात ४७ घरांची पडझड झाली.

याशिवाय कर्जतमध्ये दोन गोठ्यांचीही पडझड झाली. वादळी पावसाने जामखेड तालुक्यातील दोन गावांमधील १.२० हेक्टर क्षेत्रातील केळी व लिंबू बागा उद्ध्वस्त झाल्या तर शेवगावमधील चार गावांतील ५.५० हेक्टर क्षेत्रातील डाळिंब, आंबा, केळी, चिकूच्या भागांना फटका बसला. गेल्या आठवड्यातील बुधवारी (दि.१८) झालेल्या वादळी पावसाचा नगर, कर्जत, पाथर्डी व जामखेड तालुक्यातील २४ गावांना फटका बसला. त्यामध्ये ८९८ शेतकऱ्यांनी ४८२ हेक्टरवरील पिकाचे नुकसान झाले. २० गोठे व २६ घरांचीही पडझड झाली होती.

## भगवान फुलसौदर यांचे आयुक्तांना निवेदन

# प्रभाग चौदामध्ये अनियमित पाणी पुरवठा

समाचार/नगर-दि.२६




प्रभाग १४ मधील बुरुडगांव रोड, नक्षत्र लॉन, विनायकनगर, फुलसौंदर मळा, समता कॉलनी, आंचल विहार, वसंत विहार, अहिंसानगर, एकाडे मळा येथे अनियमित पाणी पुरवठा होत आहे. याबाबत मनपा आयुक्तांना निवेदन देऊन पाणी पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी दिला आहे.

गेल्या महिन्यांपासून ऐन उन्हाळ्यात नागरिकांच्या नळाला पाणी येत नसून, पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ऐन निवडणुकीत लोकशाहीचा उत्सव, सणासुदीचे दिवस, लग्न सराई, उष्णता यामुळे या दिवसात पाण्याची गरज जास्त असते. त्यातच मनपाने पाणी कपात केली आहे. नागरिक खाजगी टँकरद्वारे पाण्याची गरज भागवत आहेत, तेही नियमित मिळत नाहीत. परिसरातील सर्व नागरिक हे नियमित कर भरणारे आहेत. प्रभागात पाणी वितरण व्यवस्था सुरळीत न झाल्यास नागरिकांसमवेत जन आंदोलन करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## स्पर्धा परीक्षेतील यशाबद्दल समर्थ प्रशालेत सत्कार

# तागडचे यश संस्थेसाठी भूषणावह - अॅड. देशपांडे



समाचार/नगर-दि.२६

सर्वसामान्य परीस्थिती असताना मिळवलेले यश नक्कीच भूषणावह बाब आहे योग्य नियोजन तसेच अभ्यासात सातत्य असल्यास यश मिळतेच सिध्दाथ यांच्या यशाने शाळेचे नावं मोठे झाल आहे सिध्दार्थने केलेल्या कष्ट,मेहनतीचे हे फळ आहे हे यश विदयार्थ्याकरीता प्रेरणादायी आहे. सिध्दार्थ तागडने मिळवलेले यश शाळा व संस्थेसाठी भुषणावह आहे असे प्रतिपादन माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग शालेय समिती अध्यक्ष अॅड. किशोर देशपांडे यांनी केले.

सावेडीतील समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा माजी विद्यार्थी सिध्दार्थ तागडने युपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबददल संस्था व शाळेच्या वतीने अॅड. देशपांडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दिपक ओहोळ, सचिव तथा शालेय समिती अध्यक्ष सुरेश क्षीरसागर , सचिव प्र. स. ओहोळ, सचिन क्षीरसागर, स्वप्नील कुलकर्णी, मुख्याध्यापक दुर्योधन कासार,मुख्याध्यापिका संगीता जोशी,पर्यवेक्षिका वसुधा जोशी, श्री व सौ. तागड आदी मान्यवर उपस्थित होते.

भा ल जोशी, तागड यांचेही भाषण झाले. सिध्दार्थ तागड म्हणाला, सत्कार हा ज्या शाळेत शिकत होतो तेथे होणे निश्चितच आनंद देणारा आहे कारण नेहमी कार्यक्रमात आम्ही समोर बसायचो परंतू आज माझा सत्कार होत असताना ज्यांनी मला घडवलं ते समोर बसले असताना सत्कार होत आहे खऱ्या अर्थाने हा युनिक सत्कार आहे.

## महिला सबलीकरणासाठी

# देशात मोदीपर्वाची गरज- जानवे

समाचार/नगर-दि.२६

देशात महिला सबलीकरणासाठी मोदीपर्वाची गरज असून त्यासाठी नगरमधून डॉ. सुजय विखे यांना विजयी करण्याचा निर्धार करा, असे आवाहन भाजपच्या महिला आघाडीच्या शहराध्यक्षा प्रिया जानवे यांनी केले.



जानवे म्हणाल्या की, मोदी सरकारच्या पर्वात महिलांच्या विकासासाठी सर्वाधिक योजना आणल्या. याच योजना जिल्ह्यात तळागळापर्यंत पोहचविण्याचे काम मागील पाच वर्षात खासदार सुजय विखे यांनी केले. यामुळे देशात नरेंद्र मोदी आणि जिल्ह्यात डॉ. सुजय विखे हेच योग्य नेतृत्व करू शकतील, असेही त्यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या की, डॉ. सुजय विखे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्या तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना पीठ गिरणी, शेती अवजारे, पॅकिंग मशीन आदी वस्तूंच्या माध्यमातून स्वयंरोजगार देऊन त्यांच्या पायावर उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. प्रधानमंत्री मातृयोजनेच्या मार्फत दीड लाखाहून अधिक महिलांचे मातृत्व सुरक्षित आणि सुखद केले. तर उज्वला योजनेच्या माध्यमातून तीन लाखाहुन अधिक महिलांचे आरोग्य सुरक्षित केले. अशा विविध योजनाच्या माध्यमातून डॉ. सुजय विखे हे महिलांच्या मागे उभे राहिले आहेत. त्यामुळे आपल्या पाठीराख्याला विजयी करणे हे नगर जिल्ह्यातील प्रत्येक महिलेचे आद्य कर्तव्य राहणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# जसपाल नारंग यांचा स्नेह-७५ च्यावतीने सत्कार

समाचार/नगर-दि.२६

महाग होत चाललेल्या आरोग्य सेवेत आज सर्वसामान्यांना उपचार घेणे अवघड होत आहे, अशा परिस्थितीत जसपाल नारंग गरजूंना मोठा आधार ठरत आहेत. त्यांच्या हातून अशीच जनसेवा व्हावी, अशी आशा प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केली.

सावेडी उपनगरातील प्रोफेसर चौक येथे जसपाल नारंग मोफत होमिओपॅथी उपचार करुन समजसेवा करत असल्याबद्दल त्यांना डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी'ने सन्मानित केल्याबद्दल स्नेह–७५ ग्रुपच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी निता नारंग, प्रमोदकुमार छाजेड, ईश्वर सुराणा, बाळासाहेब रेणाविकर, नारंग परिवार उपस्थित होता.

जसपाल नारंग सत्कारास उत्तर देतांना म्हणाले, आपल्या कार्याची दाखल एस.एस.ए. युनिर्व्हसिटी पोर्टलॅड,यूएसए द्वारे होमिओपॅथी आणि सामाजिक क्षेत्रात करत असलेल्या कामाबद्दल डॉक्टरेट ऑफ फिलॉसॉफी' पदवी देऊन सन्मानित करण्यात आले याबद्दल स्नेह–७५ ने आपला सत्कार करुन या कार्यास प्रोत्साहनच दिले असल्याचे सांगितले.



# थोरात महाविद्यालयात सोमवारी प्राध्यापकांसाठी कार्यशाळा

समाचार/नगर-दि.२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील वाणिज्य शाखेच्या सर्व प्राध्यापकांकरीता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. दिनानाथ पाटील यांनी दिली.



याबाबत अधिक माहिती देताना डॉ.पाटील म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री आमदार बाळासाहेब थोरात व आमदार डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात महाविद्यालयाने सातत्याने गुणवत्तेचे विविध उपक्रम राबवले आहेत. नवीन शैक्षणिक धोरण व अद्यावत शिक्षण प्रणाली याकरता या महाविद्यालयात खास उपक्रम राबविण्यात येत असून जिल्ह्यातील वाणिज्य शाखेच्या सर्व प्राध्यापकांसाठी सोमवार दि. २९ एप्रिल रोजी एकदिवसीय कार्यशाळा होणार आहे. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ पराग काळकर ,प्रा यशोधन मिठारे, प्रा.सुप्रिया पाटील, प्रा मनोहर सानप, डॉ मंगेश वाघमारे मार्गदर्शन करणार आहेत.शैक्षणिक वर्ष २०२४ पंचवीस पासून नवीन शैक्षणिक क धोरण लागू होणार असल्याने या कार्यशाळेमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भाने सविस्तर चर्चा होणार आहे.

# हिवरे बाजारच्या कामांची नेपाळच्या अधिकाऱ्यांना भूरळ

समाचार/नगर-दि.२६

नेपाळ मंत्रालयातील पाणीपुरवठा व जलसंधारण विभागाच्या २६ अधिकाऱ्यांनी दि. २५ एप्रिल रोजी आदर्श गाव हिवरे बाजारला प्रक्षेत्र भेट दिली. याप्रसंगी त्यांना पद्मश्री पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार गावातील विकास कामांची माहिती दिली.



नेपाळ सरकारचे वरिष्ठ अधिकारी रमेशकुमार म्हणाले, हिवरे बाजारचा अनुभव नक्कीच उपयोगात येईल. नेपाळ व हिवरे बाजारच्या भौगोलीक रचनेत बदल आहे परंतु हिवरे बाजारने लोकसहभागातून पिक व पाणी व्यवस्थापन केल्यामुळेच हे व्यवस्थित होऊ शकते.हिवरे बाजारमध्ये पाण्याच्या पुनर्भरणापासून ते मातीचे आरोग्य यांची दक्षता घेण्याची गरज आहे.भविष्यकाळात आरोग्यदायी पाणी व अन्नाची गरज आहे ते इथे हिवरे बाजारला पहायला मिळाले. नेपाळमध्ये १२०० मि.मि.पाऊस पडूनसुध्दा पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते.याउलट हिवरे बाजारमध्ये ४०० मी.मी.पाऊस पडतो तरीही लोकसहभागातून पाण्याच्या ताळेबंदावर आधारित उत्तम प्रकारचे पिक व पाणी व्यवस्थापनमुळे पाणीटंचाई जाणवत नाही.

मिलिंद पानपाटील संचालक राष्टीय जल अकादमी,एस.सेन्थिल सहा.संचालक राष्टीय जल अकादमी यांचेमार्फत भेटीचे नियोजन करण्यात आले होते.नेपाळ देशातील टेक नाथ दहाल सहसचिव तसेच विविध खात्याचे अभियंते,कक्षप्रमुख व अर्थ विभागातील प्रमुख असे एकूण २६ व्यक्तीचा समावेश होता.प्रसन्न पवार ,हबीब सय्यद यांनी हिवरे बाजार येथील कामांची माहिती दिली.

# पुणे- नगर प्रवासादरम्यान महिलेचे मंगळसूत्र चोरीस

समाचार/नगर-दि.२६

पुणे ते नगर प्रवासादरम्यान महिलेच्या बॅगमधील ३८ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. याप्रकरणी सोनाली दीपक गुगळे (वय ४८, रा. सिंहगड रस्ता, पुणे) यांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. सदरचा गुन्हा तपासकामी येथील कोतवाली पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

कोतवाली पोलिसांनी बुधवारी (दि. २४) याबाबत नोंद करून घेतली आहे. फिर्यादी या ४ एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजता त्यांच्या पुण्यातील राहत्या घरातून पीएमपीएल बसने पुण्यातील खराळवाडी बस स्थानक येथे गेल्या. त्यावेळी त्यांच्याकडे बॅग होती.

त्या बॅगमध्ये छोटी पर्स होती व त्यात ३८ ग्रॅमचे सोन्याचे मंगळसूत्र ठेवले होते. दरम्यान तेथे त्यांना त्यांचे पती घेण्यास आले. ते दोघे त्यांच्या दुचाकीवरून नगरमधील नालेगाव येथे नातेवाईकांच्या साखरपुडा कार्यक्रमासाठी आले. तेथे रात्री नऊ वाजता त्यांनी बॅग पाहिली असता बॅगेतील पर्स दिसली नाही. पर्स व त्यातील ३८ ग्रॅमचे मंगळसूत्र चोरी गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यांनी पुणे येथे जाऊन स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेत तो कोतवाली पोलिसांकडे वर्ग केला आहे. कोतवाली पोलिसांनी २४ एप्रिल रोजी पोलीस दप्तरी नोंद करून घेतली आहे. अधिक तपास सुरू केला आहे.

# केडगावकरांनो कोतकर परिवारासारखे माझ्यावरही प्रेम करा - विखे

समाचार/नगर-दि.२६

केडगावकरांनी कोतकर कुटुंबाला भरभरून प्रेम दिले. जनता पाठीशी असल्यास खरा विकास होतो हे कोतकर कुटुंबाने दाखवून दिले. केडगावकरांनी कोतकर कुटुंबावर मोठं प्रेम केलं, तसेच प्रेम माझ्यावर करा. केडगावकरांच्या पाठीशी मी सदैव उभा आहे, असे प्रतिपादन महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांनी केले. केडगाव येथे संदीप दादा कोतकर युवा मंचच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त भंडारा वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. विखे यांनी केडगावकरांशी संवाद साधला. याप्रसंगी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, उद्योजक सचिन कोतकर, जिल्हा बँकेच्या संचालिका सुरेखा कोतकर, निखिल वारे, शकुंतला पवार, माजी




नगरसेविका सुनीता कांबळे, सविता कराळे, लताताई शेळके, साहेबराव विधाते, मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, सुनील कोतकर, नीलेश सातपुते, भूषण गुंड, क्षीरसागरमहाराज, धनंजय जामगावकर, पंकज जहागिरदार, अभय भळगट, बाबा कोतकर, खाकाळ आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


माजी महापौर संदीप कोतकर यांनी ऑनलाइन केडगावकरांशी संवाद साधला. ते म्हणाले की, विखेंनी केडगावचं पालकत्व स्वीकारावं. विकासाची कामे केली तर नसती, तर केडगावकरांनी प्रेम केलं नसतं. आपले प्रश्न कोण सोडवू शकतो, याचा विचार नागरिकांनी करायला हवा. विखे परिवारावर विश्वास आहे. केडगावची श्रीरामाची सेना त्यांच्या पाठीशी आहे, असे ते म्हणाले. उद्योजक सचिन कोतकर यांचे भाषण झाले.

## श्रीरामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी

# ३ कोटी १४ लाखांचा निव्वळ नफा- गोपाल मणियार


श्रीगोपाल धूत


गोपाल मणियार


मधुसूदन सारडा

**समाचार/नगर-दि.२६**

श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीला सर्व प्रकारच्या तरतूदी वजा जाता ३१ मार्च २०२४ अखेर ३ कोटी १४ लाख रूपयांचा निव्वळ नफा झाला आहे. तसेच संस्थेकडे वर्ष अखेर ८२.१० कोटी रूपयांच्या ठेवी असून कर्ज वितरण ५२.६३ कोटी रुपयांचे झाले आहे. उत्कृष्ट आर्थिक कामगिरीची परंपरा कायम राखण्यात संस्था यशस्वी झाली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष गोपाल माणियार यांनी दिली.

संस्थेच्या संचालक मंडळाची सभा नुकतीच अध्यक्ष गोपाल माणियार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक सीए एन.जे. लोहे अ‍ॅण्ड कंपनीचे सीए पुनीत व्होरा यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर केला. सभेला संचालक श्रीगोपाल धूत, उपाध्यक्ष मधुसूदन सारडा, राजेंद्र गुजराथी, लक्ष्मीकांत झंवर, ओमप्रकाश चांडक, प्रकाश गांधी, विश्वनाथ कासट, राजेंद्र मालू, राजेंद्रकुमार कंत्रोड, अ‍ॅड. अशोक बंग, मथुराबाई झंवर, अनुरिता झगडे, हे उपस्थित होते. तसेच व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व उपव्यवस्थापक अतुल डेरे हे देखील उपस्थित होते. सर्वांनी गोपाल माणियार व मधुसूदन सारडा यांचे अभिनंदन केले. गोपाल माणियार म्हणाले की, संस्थेने इतर बँकेत ७९.४२ कोटी रुपयांची सुरक्षित गुंतवणूक केली आहे व इतर निधी ३२.१९ कोटी रुपये उपलब्ध आहे. तसेच संस्थेचा नेट एन.पी.ए. नेहमीप्रमाणे शून्य आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत यांचे बहुमोल मार्गदर्शन, शिस्तबद्ध व उत्कृष्ट कार्यपद्धती, उपाध्यक्ष मधुसूदन सारडा व सर्व संचालकांचे योगदान यामुळेच संस्थेची सातत्याने प्रगती होत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यामुळेच भरीव कार्य करता आले. असेही त्यांनी सांगितले. लक्ष्मीकांत झंवर यांनी सी.ए. पुनीत व्होरा यांनी संस्थेला वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे आभार मानले. संस्थेकडून अल्पदरात कॅश क्रेडिट, टर्म लोन, वाहन कर्ज, आणि सोने तरण कर्ज फक्त ७ टक्के व्याजदराने दिले जाते. याचा सर्व ग्राहकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्या वतीने लक्ष्मीकांत झंवर यांनी केले. उपाध्यक्ष मधुसूदन सारडा यांनी सर्वांचे आभार मानले.


## अहमदनगरच्या कलाकारांचा सहभाग

# आर्ट असोसिएटस्तर्फे २७ ला विश्वविक्रमासाठी शास्त्रीय नृत्यातील अनोखा आविष्कार

**समाचार/नगर-दि.२६**

आर्ट असोसिएटस....तीन मैत्रिणीच्या संकल्पनेतून पुढे आलेलं व्यासपीठ. याव्यासपीठातर्फे येत्या २७ तारखेला शंकराचार्य न्यास येथे विश्वविक्रमासाठी शास्त्रीय नृत्यातील विविध नृत्य तालांचा( रिले फॉरमॅट) आविष्कार सादर केला जाणार आहे. रिले फॉरमँट वर्गवारीमध्ये विश्व विक्रम नोंदविण्याचा हा त्याच्या संस्थेचा पहिलाच प्रयत्न असेल.

अमी छेडा, राधिका चावरे आणि तोरल टकले या तिघी मैत्रीणींनी आपल्या मैत्रीची वीण अधिक घट्ट व्हावी, या उद्देशाने आर्ट असोसिएटस् ची स्थापना केली. या तिघींचे नृत्यावर असलेले प्रेम




आणि वर्षभर विविध भारतीय सणांना नृत्यनाट्य रुपात गुंफताना त्याचे स्वरूप कसे असू शकते, या एका संकल्पनेने त्यांच्या मनाचा ताबा घेतला आणि त्यातूनच आर्ट असोसिएटस् ची निर्मिती झाली. एक आगळावेगळा कार्यक्रम घेण्याच्या उद्देशाने नृत्य तालाचा हा कार्यक्रम २७ एप्रिल रोजी होणार आहे. कार्यक्रमात विविध प्रकारच्या शास्त्रीय नृत्यातून पौराणिक व ऐतिहासिक कथा नृत्याद्वारे महाराष्ट्रातील नृत्यांगना, विश्वविक्रमासाठी एका पाठोपाठ न थांबता सादर करणार आहे.

यासाठी संभाजीनगर इथून कुचीपुडी आणि ओडिसी नृत्य कलाकार सहभागी होणार आहेत. १५० पेक्षा कलाकार, सलग ७ तासाहून अधिक नृत्य करणार आहेत. यात अहमदनगरचे कलाकार देखील सहभागी होणार आहेत.

## जैन वात्सल्य संस्थेचा मासिक शिधावाटप उपक्रम

# सामाजिक बांधिलकी जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे - अजित बोरा

**समाचार/नगर-दि.२६**

जैन वात्सल्य संस्थेने स्थापनेपासून प्रत्येक महिन्याला जैन समाजातील अपंग, विधवा, वृद्ध व्यक्तींसाठी तसेच अधिकारहीन व कमी भाग्यशाली लोकांसाठी एक महिन्याकरिता पुरेल इतका शिधा वितरण करण्याची परंपरा जपलेली आहे. याच परंपरे नुसार याही महिन्यात जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष अजित बोरा यांच्या हस्ते व संस्थेचे उपाध्यक्ष सुभाष झुंबरलाल मुथा, मा. सचिव विजय गुगळे, ईश्वर अशोक बोरा, विजय गुंदेचा, महेश गुगळे





ह्यांच्या उपस्थितीत शिधा वाटप करण्यात आले. सदर शिधा वाटपाचे वितरण अशोक कोठारी यांच्या निवासस्थानी झाले. यावेळी संस्थेच्या सचिवांनी संस्थेस सदर शिधा वाटपाचे उपक्रम करिता सदैव आपले प्रांगण उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

यावेळी बोलताना अध्यक्ष अजित बोरा यांनी सांगितले की, परमेश्वराने आपल्याला जन्माला घालताना भाग्यशाली म्हणून जन्माला घातले आहे पण हे भाग्य केवळ आपल्यासाठी नसून, यात इतरांच्यासाठी देण्याचे दायित्व देखील असते, प्रत्येकाने यात सामील होऊन आपल्या उत्पन्नातून काही भाग अश्या कार्यास संपर्पित करत सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे.

उपाध्यक्ष सुभाष मुथा यांनी देखील उपस्थितांना मार्गदर्शन करत संस्थेचा हा प्रयत्न समाजातील निराधारांना आधार देण्याचा असून, भविष्यात सर्वांनी समृद्ध होऊन आपल्या हाताने देखील सामाजिक कार्य करण्याचे संकल्प करावेत. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विजय गुगळे यांनी केले. उपस्थितांचे आभार संचालक महेश गुगळे यांनी मानले.


**SASE DCORATERS**



Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

**विकणे आहे**

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १००० स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.

-: संपर्क :-

9011923939

**स्वतंत्र बंगला विकणे आहे**

उत्तम कंडीशन, पुर्णवेळ पाणी, शहरालगत 1000 स्क्वे. फुट प्लॉट व 1000 स्क्वे.फुट कन्स्ट्रक्शन्स असलेला 1 बीएचके बंगला विकणे आहे.

वाघमळा, मॅजिस्ट्रिक टॉवर समोर, महापौर वाकळे बंगला परिसर, सावेडी, अ.नगर

मो. 9960868888

**UNITED PHARMA**

Pharmaceutical Distributors

Near Kedgaon Ves, Kedgaon

9049934444
7972378081
9822020649

**विकणे आहे**

चालू स्थितीतील जिम साहित्य त्वरित विकणे आहे.

- संपर्क -

9834448462
9175075992

**नवीन रो-बंगले विकणे**

बोल्हेगाव येथे सर्व सुविधांयुक्त उत्तम लोकेशन व क्वॉलिटीचे सलग ३ नवीन रो-बंगले विकणे आहेत.

-किंमत-

1 RK रू.१७.५० लाख
1 BHK रू.२५.५० लाख

एजंट/ब्रोकर स्वागतार्ह

-: संपर्क :-

9273448462

Loans upto 100 crores



- Loan against any Residential / Commercial / Industrial Property
- Loan for Hospitals / Hotels / Schools / Colleges / N. A. Plots
- Commercials Purchase / Lease Rental Discounting
- Construction Finance For Builders
- Business Loan / Home Loan

MONEY MATTERS CAPITAL MASTERS

201, Girnar House, 2nd Floor, Above CSB Bank, Market Yard Road, Near Hotel Ustav, Pune 37.
205, 2nd Floor, Parmesh Plaza Hatti Ganpati Chowk, Sadashiv Peth, Pune - 30.
180, Bhawani Peth, Palkhi Vithoba Chowk, Pune - 411042

Abhijeet Jain Avinash Gandhi Kapil Singh
9881498790 / 9881498791 / 8087073646 www.moneymattersindia.in

**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**



वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)

स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर

9011020176, 9011026483, 7499980845

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या

**सेक्स समस्या**

वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य

डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२७ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)

१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार

ISO मानांकन प्राप्त सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहमदनगर

संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात | दिनांक - २६ एप्रिल ते २ मे २०२४



| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 9.00 PM |
| CREW | 4.00 PM |
| GHOST BUSTERS FROZEN | 12.15 PM 8.00 PM |
| GODZILLA X KONG | 5.40 PM |
| जुनं फर्निचर | 9.20 AM, 2.45 PM 7.30 PM, 10.15 PM |
| मैंदान | 12.30 PM |
| RAZAKAR | 4.30 PM |
| RUSLAAN | 8.15 AM, 2.05. PM, 6.35 PM, 10.30 PM |
| स्वातंत्र्यवीर सावरकर | 10.45 AM |
| द लिगसी ऑफ जिनेश्वर | 9.00 AM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher * - Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show CONNPLEX AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

Milk & Cream Icecream Product

HATSUN Daily

Arun® ICECREAMS



प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144